गुरुवार दि. १६ जुलै २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ३१५ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जेष्ठहृता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## मंगळबाजार परिसरात महापालिकेचा अतिक्रमण हटाव धडाका; ५२ अनधिकृत अतिक्रमणे हटवली

### दोन जेसीबी, टिप्पर आणि पोलीस बंदोबस्तात कारवाई; पुन्हा अतिक्रमण केल्यास कठोर कायदेशीर कारवाईचा इशारा





**जालना । प्रतिनिधी**

जालना शहर महानगरपालिका प्रशासनाने शहरातील अनधिकृत अतिक्रमणांविरोधातील मोहीम अधिक तीव्र केली असून, आयुक्त श्रीमती अंजली शर्मा यांच्या निर्देशानुसार बुधवारी (दि. १५ जुलै) मंगळबाजार व भिकारी चौक परिसरात मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण हटाव कारवाई करण्यात आली. या मोहिमेदरम्यान एकूण ५२ अनधिकृत अतिक्रमणे हटविण्यात आली. शहरातील वाहतूक सुरळीत करणे, पादचाऱ्यांना सुरक्षित मार्ग उपलब्ध करून देणे तसेच सार्वजनिक जागा अतिक्रमणमुक्त करण्याच्या उद्देशाने ही कारवाई करण्यात आल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

कारवाईसाठी महानगरपालिकेने दोन जेसीबी, एक टिप्पर आणि मोठा अधिकारी-कर्मचारी वर्ग तैनात केला होता. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस प्रशासनाचाही बंदोबस्त ठेवण्यात आला होता. त्यामुळे संपूर्ण कारवाई शांततेत आणि नियोजनबद्ध पद्धतीने पार पडली.

या अतिक्रमण हटाव मोहिमेचे नेतृत्व उपायुक्त त्र्यंबक कांबळे आणि सहाय्यक आयुक्त विजय फुलंब्रीकर यांनी केले. त्यांच्यासह शोएब खान, शुभम जाधव, राहुल हिवाळे, मॅथ्यू चॉको, फेरोज बेग, कादर खान, तुषार लोखंडे तसेच महानगरपालिकेचे इतर अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महानगरपालिका प्रशासनाने नागरिकांना स्पष्ट इशारा देत सांगितले आहे की, ज्या ठिकाणी अतिक्रमण हटविण्यात आले आहे त्या ठिकाणी पुन्हा अतिक्रमण केल्याचे आढळल्यास संबंधितांविरुद्ध महाराष्ट्र महानगरपालिका कायद्यानुसार कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तसेच अतिक्रमण हटविण्यासाठी प्रशासनाला आलेला खर्चही संबंधित अतिक्रमणधारकांकडून वसूल करण्यात येणार आहे.

शहरातील मुख्य रस्ते, बाजारपेठा आणि सार्वजनिक ठिकाणे अतिक्रमणमुक्त ठेवण्यासाठी ही मोहीम केवळ एकदिवसीय नसून पुढील काळातही सातत्याने राबविण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. नागरिकांनी सार्वजनिक जागांवर अतिक्रमण करू नये आणि शहर स्वच्छ, सुरक्षित व वाहतुकीसाठी सुलभ ठेवण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.

## इंदेवाडीच्या ५०० मिमी जलवाहिनीला भगदाड; नवीन जालना व मंगळबाजार परिसराचा पाणीपुरवठा एक-दोन दिवस उशिराने

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहराच्या पाणीपुरवठ्यावर परिणाम करणारी महत्त्वाची घटना घडली असून, इंदेवाडी येथून जलशुद्धीकरण केंद्राकडे जाणाऱ्या ५०० मिमी व्यासाच्या मुख्य जलवाहिनीला भगदाड पडल्याने नवीन जालना आणि मंगळबाजार परिसरातील पाणीपुरवठा एक ते दोन दिवस उशिराने होणार आहे. या पार्श्वभूमीवर जालना शहर महानगरपालिकेने नागरिकांना पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे तसेच दुरुस्तीचे काम पूर्ण होईपर्यंत प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

महानगरपालिका आयुक्त श्रीमती अंजली शर्मा, पाणीपुरवठा व जलनिस्सारण समितीच्या सभापती श्रीमती पुनम राज स्वामी, उपसभापती भगवान चांदोडे आणि शहर अभियंता राजेश बगळे यांच्या वतीने प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहीर आवाहनात ही माहिती देण्यात आली.

महापालिकेच्या माहितीनुसार, इंदेवाडी ते जलशुद्धीकरण केंद्र या मार्गावरील मुख्य जलवाहिनी फुटल्यामुळे पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे. या जलवाहिनीद्वारे शहरातील विविध भागांना पाणीपुरवठा केला जात असल्याने नवीन जालना आणि मंगळबाजार परिसरातील नियोजित पाणीपुरवठ्यावर थेट परिणाम झाला आहे.

बिघाडाची माहिती मिळताच पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी आणि कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली असून, युद्धपातळीवर दुरुस्तीचे काम सुरू करण्यात आले आहे. पाईपलाईनमधील भगदाड तातडीने बुजवून पाणीपुरवठा शक्य तितक्या लवकर पूर्ववत करण्यासाठी आवश्यक यंत्रसामग्री आणि मनुष्यबळाची नियुक्ती करण्यात आली आहे.

महानगरपालिका प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, दुरुस्तीचे काम पूर्ण होईपर्यंत उपलब्ध पाण्याचा काटकसरीने व जबाबदारीने वापर करावा. पिण्याचे पाणी अनावश्यक वापर टाळून अत्यावश्यक गरजांसाठीच वापरावे, जेणेकरून पाणीटंचाईचा त्रास कमी होईल. प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, दुरुस्तीचे काम पूर्ण होताच पाणीपुरवठा पूर्ववत करण्यात येईल. *(पान २ वर)*

## घनसावंगी महसूल विभागातील रिक्त पदे तातडीने भरा; अन्यथा तहसील कार्यालयाला कुलूप ठोको आंदोलनाचा इशारा

### सातबारा, फेरफार, दाखले आदी कामे रखडल्याने नागरिक त्रस्त; गुरुवारपर्यंत कार्यवाहीची मागणी

**घनसावंगी । प्रतिनिधी**

घनसावंगी तालुक्यातील महसूल विभागात अनेक महत्त्वाची पदे दीर्घकाळापासून रिक्त असल्याने महसुली कामकाजावर गंभीर परिणाम होत असून नागरिकांना मोठ्या मनस्तापाला सामोरे जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर महसूल विभागातील रिक्त पदे तात्काळ भरावीत, अन्यथा शुक्रवार रोजी घनसावंगी तहसील कार्यालयास कुलूप ठोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा तालुक्यातील नागरिक आणि शेतकरी यांनी प्रशासनाला दिला आहे.



यासंदर्भात प्रशासनाला सादर करण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, महसूल विभागात कर्मचारीअभावी दैनंदिन कामकाज मोठ्या प्रमाणात विस्कळीत झाले आहे. सातबारा उतारे, फेरफार, विविध प्रकारचे दाखले, जमिनीच्या नोंदी, उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र तसेच इतर अनेक महसुली सेवांसाठी नागरिकांना वारंवार तहसील कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागत आहेत. कर्मचारी अपुरे असल्यामुळे अर्जांची निकाली काढण्याची प्रक्रिया संथ झाली असून अनेक कामे महिनोनमहिने प्रलंबित राहत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

निवेदनानुसार, या परिस्थितीचा सर्वाधिक फटका शेतकरी, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, बेरोजगार युवक तसेच विविध शासकीय *(पान २ वर)*

## पंढरपूर सायकल वारी यशस्वी; डॉ पंडित सुरशे यांचा सत्कार

**दत्ता देशमुख**

आषाढी एकादशीच्या पवित्र मुहूर्तावर टेंभुर्णी येथून पंढरपूरसाठी निघालेल्या सायकल वारकऱ्यांनी आपली भक्तीमय वारी यशस्वीरित्या पूर्ण केली आहे. भोकरदन-जाफ्राबाद रनर्सचे अध्यक्ष तथा प्रसिद्ध मॅरेथॉनपटू पंडित सुरशे यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या या सायकल वारीचे टेंभुर्णी आणि संपूर्ण परिसरातील नागरिकांनी कौतुक केले आहे. पंढरपूर येथे विठ्ठल-रुक्मिणीचे मनोभावे दर्शन घेऊन सर्व सायकलपटू सुखरूपपणे आपल्या गृहनगरीत परतले आहेत.



टेंभुर्णी परिसरातील सायकल प्रेमी आणि विठ्ठल भक्तांनी एकत्र येत या विशेष सायकल वारीचे आयोजन केले होते. ''पुंडलिक वरदे हरी विठ्ठल'' चा जयघोष करत या वारकऱ्यांनी टेंभुर्णी ते पंढरपूर हे शेकडो किलोमीटरचे अंतर सायकलने पार केले. पोहोचल्यानंतर सर्व सायकल विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शन घेतले. विठ्ठलाचे दर्शन घेऊन वारीची यशस्वी सांगता केल्यानंतर सुखरूपपणे गावी परतले. टेंभुर्णी शहरात आगमन होताच स्थानिक मॉर्निंग ग्रुपच्या वतीने पंडित सुरशे यांचा सत्कार करण्यात आला

**'सायकल चालवल्यामुळे आरोग्याचा संदेश मिळतो आणि प्रदूषणही टाळता येते. विठ्ठलाच्या भक्तीच्या ताकदीमुळे आणि सर्व सहकाऱ्यांच्या प्रेरणेमुळे आम्ही हा कठीण प्रवास कोणत्याही अडचणीशिवाय आनंदाने पूर्ण करू शकलो**

**सायकल वारीच्या माध्यमातून ग्रामीण भागातील तरुणांना सायकलिंग, धावणे (रनिंग) आणि शारीरिक तंदुरुस्तीचे महत्त्व कळावे, हा मुख्य उद्देश होता.**

**या मोहिमेमुळे संपूर्ण परिसरातून सायकल भक्तांवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.**

**-डॉ.पंडित सुरशे**
**सायकलिस्ट टेंभुर्णी**

## जिल्हा क्रिकेट असोसिएशन जालनाच्या ९ खेळाडूंची महाराष्ट्राच्या संभाव्य संघात निवड

### जिल्ह्यासाठी अभिमानाची कामगिरी८ महिला व १ पुरुष क्रिकेटपटूची राज्यस्तरीय संधी; प्रशिक्षक ऋषिकेश काने यांच्या मार्गदर्शनाला यश

**जालना । प्रतिनिधी**

जिल्हा क्रिकेट असोसिएशन, जालना साठी अभिमानाची बाब ठरावी अशी मोठी कामगिरी जिल्ह्यातील युवा क्रिकेटपटूंनी केली आहे. असोसिएशनच्या तब्बल ९ खेळाडूंची महाराष्ट्र क्रिकेट संघाच्या विविध वयोगटांतील संभाव्य संघात निवड झाली असून, त्यामध्ये ८ महिला क्रिकेटपटू आणि १ पुरुष क्रिकेटपटूचा समावेश आहे. या निवडीमुळे जालना जिल्ह्यातील क्रिकेटला नवी ओळख मिळाली असून, ग्रामीण व शहरी भागातील खेळाडूंमध्येही उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.महाराष्ट्राच्या संभाव्य संघात स्थान मिळविणाऱ्या खेळाडूंनी सातत्यपूर्ण मेहनत, नियमित सराव आणि उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर ही संधी मिळवली आहे. या सर्व खेळाडूंना प्रशिक्षक ऋषिकेश काने यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले असून, त्यांच्या प्रशिक्षणातून अनेक खेळाडू राज्यस्तरावर पोहोचत असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.१५ वर्षांखालील मुलींच्या संभाव्य संघात पाच जणींची निवड१५ वर्षांखालील मुलींच्या महाराष्ट्र संभाव्य संघात संस्कृती घोरतळे, आरोही आहेर, स्नेहा जगताप, अपूर्वा रूपनर आणि सोनाक्षी गुंजाळ या पाच खेळाडूंनी स्थान मिळवले आहे. या सर्व खेळाडूंनी जिल्हास्तरीय आणि विभागीय स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत निवडकर्त्यांचे लक्ष वेधून घेतले.१९ वर्षांखालील मुलींच्या संघात दोन खेळाडू१९ वर्षांखालील मुलींच्या संभाव्य संघासाठी जितेश्री दामले आणि मानिनी वायाळ यांची निवड झाली आहे.

दोघींनीही सातत्यपूर्ण फलंदाजी व गोलंदाजीच्या कामगिरीच्या जोरावर राज्यस्तरीय संधी मिळवली आहे.वरिष्ठ महिला संघात आरती केदारवरिष्ठ महिला महाराष्ट्र संभाव्य संघात आरती केदार हिने स्थान मिळवत जालना जिल्ह्याचा मान उंचावला आहे. वरिष्ठ स्तरावरील ही निवड तिच्या मेहनतीची आणि सातत्यपूर्ण कामगिरीची पावती मानली जात आहे.१९ वर्षांखालील मुलांच्या संघात ओंकार वाघपुरुष गटात १९ वर्षांखालील मुलांच्या महाराष्ट्र संभाव्य संघात ओंकार वाघ याची निवड झाली आहे. उत्कृष्ट क्रिकेट कौशल्याच्या जोरावर त्याने राज्यस्तरीय संघात स्थान मिळवले असून, भविष्यात महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करण्याची मोठी संधी त्याच्यासमोर आहे.जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या प्रयत्नांना यशजिल्हा क्रिकेट असोसिएशन, जालना आणि साई काने क्रिकेट अकादमी यांच्या माध्यमातून जिल्ह्यात क्रिकेटच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. आधुनिक प्रशिक्षण, नियमित सराव, स्पर्धांमध्ये सहभाग आणि खेळाडूंना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याचा परिणाम आता राज्यस्तरावरील निवडीच्या स्वरूपात दिसून येत आहे.सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षावया उल्लेखनीय यशाबद्दल जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. नरेंद्र देशपांडे, उपाध्यक्ष रमेश मगरे, दिलीप शहा, ॲड. श्रीकांत देशपांडे, सौरभ नाईक, महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे सदस्य व टूर्नामेंट कमिटीचे चेअरमन राजू काने, जॉइंट सेक्रेटरी अभिजीत चव्हाण, संतोष भारोटे, संदीप पाटील यांच्यासह सर्व पदाधिकाऱ्यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले.


Omkar Wagh (Ambad)


Aarohi Aher


Jiteshri Damale


Sanskruti Ghortale


Manini Wayal


Sonakshi Gunjal


Apurva Rupnar


Aarti Kedar


Sneha Jagtap

तसेच खासदार डॉ. कल्याण काळे, माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे, आमदार अर्जुन खोतकर, आमदार संतोष दानवे, आमदार नारायण कुचे, माजी मंत्री राजेश टोपे, कैलास गोरंट्याल, भास्करराव दानवे, भास्करराव आंबेकर, विष्णू पाचफुले, महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत तसेच जिल्ह्यातील विविध मान्यवरांनी निवड झालेल्या खेळाडूंचे कौतुक करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.जालना जिल्ह्यातील शहरी आणि ग्रामीण भागातील क्रिकेटप्रेमींनीही या यशाचे स्वागत केले असून, भविष्यात या खेळाडूंमधून महाराष्ट्र आणि भारताचे प्रतिनिधित्व करणारे क्रिकेटपटू घडावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. खेळाडू, त्यांचे पालक, प्रशिक्षक ऋषिकेश काने, जिल्हा क्रिकेट असोसिएशन, जालना आणि साई काने क्रिकेट अकादमी यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे.

# संपादकीय....

## लोकप्रतिनिधी कोण... आणि प्रतिनिधित्व कोणाचे?

जालना महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत झालेले एक वक्तव्य आता केवळ राजकीय चर्चेचा विषय राहिलेले नाही; तर ते स्थानिक स्वराज्य संस्थांमधील लोकप्रतिनिधित्वाच्या मूलभूत संकल्पनेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे ठरले आहे. नगरसेवक जगदीश भरतीया यांनी महिला नगरसेवकांच्या पती किंवा नातेवाईकांकडून प्रत्यक्ष क्षेत्रातील कामे पाहिली जात असल्याचा उल्लेख करत आयुक्तांच्या परिपत्रकावर पुनर्विचाराची मागणी केली. या विधानामुळे प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि नागरिक यांच्यासमोर काही महत्त्वाचे प्रश्न उभे राहिले आहेत. लोकशाही व्यवस्थेत मतदार एखाद्या व्यक्तीला मतदान करतात. निवडून आलेल्या त्या व्यक्तीला कायदेशीर अधिकार, जबाबदारी आणि उत्तरदायित्व प्राप्त होते. तिच्या किंवा त्याच्या जागी इतर कोणालाही अधिकृतपणे निर्णय घेण्याचा किंवा प्रशासकीय हस्तक्षेप करण्याचा अधिकार नसतो. त्यामुळे ''प्रत्यक्ष काम कोण करतो?'' हा प्रश्न केवळ व्यवहाराचा नसून लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांचा आहे. अर्थात, वास्तवाचा दुसरा पैलूही नाकारता येणार नाही. अनेक वेळा लोकप्रतिनिधींचे कुटुंबीय सामाजिक कामात मदत करतात, नागरिकांच्या तक्रारी ऐकून घेतात, कार्यक्रमांचे समन्वयन करतात किंवा जनसंपर्क साधतात. अशा प्रकारचे सामाजिक सहकार्य आणि अधिकृत प्रशासकीय हस्तक्षेप यामध्ये स्पष्ट फरक आहे. जर निवडून न आलेली व्यक्ती अधिकारी-कर्मचाऱ्यांना आदेश देत असेल, फाईल्सवर प्रभाव टाकत असेल किंवा निर्णय प्रक्रियेत सहभागी होत असेल, तर ते प्रशासकीय आणि लोकशाहीच्या दृष्टीने गंभीर ठरू शकते. याच पार्श्वभूमीवर मनपा आयुक्तांनी नगरसेवकांच्या नातेवाईकांच्या कार्यालयीन हस्तक्षेपावर निर्बंध घालणारे परिपत्रक काढले होते. अशा परिपत्रकांचा उद्देश व्यक्तीविशेषावर कारवाई करणे नसून, अधिकृत जबाबदारीची रेषा स्पष्ट ठेवणे हा असतो. अधिकारी कोणाशी संवाद साधणार, निर्देश कोणाकडून स्वीकारणार आणि उत्तरदायित्व कोणाचे राहणार, हे स्पष्ट असणे कोणत्याही प्रशासनासाठी आवश्यक आहे. भरतीया यांच्या वक्तव्याचा आणखी एक पैलू महत्त्वाचा आहे. जर त्यांनी मांडलेले चित्र वास्तवाच्या जवळ असेल, तर तो प्रश्न केवळ एका व्यक्तीचा किंवा एका पक्षाचा राहत नाही. तो संपूर्ण स्थानिक स्वराज्य व्यवस्थेच्या कार्यपद्धतीचा विषय ठरतो. अशा परिस्थितीत भावनिक किंवा राजकीय प्रतिक्रिया देण्यापेक्षा वस्तुनिष्ठ पडताळणी आणि आवश्यक असल्यास स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी अधिक महत्त्वाची ठरेल. या प्रकरणात आणखी एक संवेदनशील मुद्दा म्हणजे महिला लोकप्रतिनिधींचे प्रतिनिधित्व. अनेक महिला नगरसेविका स्वतः सक्रियपणे काम करतात, निर्णय घेतात आणि नागरिकांशी थेट संवाद साधतात. त्यामुळे सर्व महिला लोकप्रतिनिधींबाबत एकसारखा निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही. मात्र, जर काही ठिकाणी सरपंच पतीसारखी संस्कृती स्थानिक स्वराज्य संस्थांमध्येही डोकावत असेल, तर ती महिला सक्षमीकरणाच्या उद्दिष्टालाच बाधा ठरू शकते. आता अपेक्षा आहे ती या विषयावर संयमी आणि संस्थात्मक प्रतिसादाची. प्रशासनाने आपल्या परिपत्रकाची अंमलबजावणी कायदेशीर चौकटीत आणि सर्वांसाठी समान निकषांवर करावी. त्याचबरोबर लोकप्रतिनिधींनीही नागरिकांनी दिलेला अधिकार स्वतः वापरावा आणि त्याबाबतचे उत्तरदायित्व स्वीकारावे. लोकशाहीत प्रतिनिधित्व हे हस्तांतरित करता येणारे अधिकारपत्र नसते. नागरिकांनी ज्यांच्यावर विश्वास ठेवून मतदान केले, त्यांनीच त्या विश्वासाचे प्रतिनिधित्व करणे ही लोकशाहीची अपेक्षा आहे. त्यामुळे या वादाकडे केवळ राजकीय आरोप-प्रत्यारोप म्हणून न पाहता, स्थानिक स्वराज्य संस्थांतील पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि लोकप्रतिनिधित्व अधिक सक्षम करण्याची संधी म्हणून पाहिले, तर त्यातून सकारात्मक बदल घडू शकतो.

## अमृतची लाभदायी योजना व्यवसाय कर्जावरील व्याज परतावा

**जालना -प्रतिनिधी**

महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) या महाराष्ट्र शासनाच्या स्वायत्त संस्थेमार्फत राबविण्यात येणारी वैयक्तिक व्याज परतावा योजना आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील युवक-युवतींना उद्योग व व्यवसाय उभारणीसाठी प्रभावी आर्थिक आधार देत आहे.या योजनेचा लाभ खुल्या प्रवर्गातील अशा जातींमधील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील युवक-युवतींना मिळतो, ज्यांना शासनाच्या कोणत्याही स्वतंत्र विभाग, संस्था किंवा महामंडळामार्फत योजनांचा लाभ मिळत नाही.

स्वतःचा उद्योग, व्यवसाय किंवा सेवा उपक्रम सुरू करण्यासाठी आवश्यक भांडवल उभारणीसाठी बँकेकडून कर्ज घेणाऱ्या पात्र लाभार्थ्यांना आर्थिक दिलासा मिळावा, या उद्देशाने अमृत संस्थेमार्फत कमाल १५ लाख रुपयांपर्यंतच्या कर्जावर जास्तीत जास्त १२ टक्के दराने दोन वर्षांचा व्याज परतावा दिला जातो. या योजनेमुळे उद्योजकांचा आर्थिक भार कमी होऊन स्वयंरोजगाराला चालना मिळत असून, नवउद्योजकांना व्यवसाय अधिक सक्षमपणे उभारण्याची संधी उपलब्ध होत आहे.

आवश्यक कागदपत्रे - आधार कार्ड, पॅन कार्ड, शाळा सोडल्याचा दाखला (टी.सी.) / शाळा निर्गम प्रमाणपत्र / जातीचा सक्षम कागदोपत्री पुरावा, वार्षिक उत्पन्नाचा दाखला (रु. ८ लाखांपेक्षा कमी) , अधिवास प्रमाणपत्र ( )संपर्क: अमृत जिल्हा कार्यालय, दुसरा मजला, प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना मो.७३९१०६५४७४
जालना जिल्ह्यातील पात्र लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह अर्ज करून या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन अमृत संस्थेचे जिल्हा व्यवस्थापक नितीन खेकाळे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# महाराष्ट्राचा विवेकी आवाज; प्रा.डॉ. एन डी पाटील

फुले, शाहू, आंबेडकरी विचारांचा पुरोगामी वारसा चालवणारे सत्यशोधक विचारवंत प्रा डॉ एन डी पाटील यांचा आज जयंती. प्रा डॉ एन डी पाटील यांचे पूर्ण नाव नारायण ज्ञानदेव पाटील असे असून त्यांचा जन्म १५ जुलै १९२९ रोजी सांगली जिल्ह्यातील नागाव मधील ढवळी येथे एका गरीब शेतकरी कुटुंबात झाला. घरची परिस्थिती गरिबीची असूनही त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी पुणे विद्यापीठातून अर्थशास्त्रातून एम ए आणि एल एल बी चे शिक्षण घेतले.

प्रा डॉ एन डी पाटील यांनी १९५४ ते १९५७ या कालावधीत सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये अध्यापनाचे कार्य केले. याशिवाय त्यांनी कमवा आणि शिका योजनेचे रेक्टर म्हणूनही काम पाहिले. १९६० साली ते इस्लामपूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजचे प्राचार्य म्हणून रुजू झाले. त्यांच्यावर कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचा मोठा प्रभाव होता. कर्मवीरांच्या विचारातून प्रेरणा घेऊनच त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले. शिवाजी विद्यापीठाचे पहिले सल्लागार म्हणूनही त्यांनी काम पाहिले. ( १९६२ ) त्यानंतर शिवाजी विद्यापीठाचे सिनेट सदस्य म्हणूनही त्यांनी काम पाहिले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी १९७६ ते १९७८ या कालावधीत शिवाजी विद्यापीठात समाजशास्त्र विभागाचे डीन म्हणूनही काम पाहिले. याचबरोबर १९९१ साली त्यांनी महाराष्ट्र राज्य शिक्षण आयोगाचे सदस्य म्हणून काम पाहिले. प्रा डॉ एन डी पाटील हे १९५९ पासून रयत शिक्षण संस्थेचे कौन्सिल मॅनेजमेंट सदस्य म्हणून कार्यरत होते. १९९० साली रयत शिक्षण संस्थेच्या चेअरमनपदी त्यांची नियुक्ती झाली. प्रा डॉ एन डी पाटील यांनी शैक्षणिक क्षेत्रात आपल्या कार्य कर्तुत्वाचा आगळा वेगळा ठसा उमटवला.

शैक्षणिक क्षेत्राप्रमाणेच राजकीय क्षेत्रातही त्यांनी आपल्या कार्य कर्तुत्वाने वेगळा ठसा उमटवला. १९४८ साली त्यांनी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला. त्यानंतर १९५७ साली त्यांनी मुंबईतील गिरणी कामगारांच्या संघटनेचे सरचिटणीस म्हणून काम पाहिले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी महाराष्ट्राच्या विधान परिषदेत १८ वर्ष सदस्य म्हणून काम केले. १९७८ ते १९८० या काळात ते महाराष्ट्राचे सहकार मंत्री होते. १९८५ साली ते कोल्हापूर मतदार संघातून विधानसभेचे सदस्य म्हणूनही निवडून गेले. १९९९ ते २००२ या काळात ते लोकशाही आघाडी सरकारचे निमंत्रक होते.

आपले आयुष्य समाज कार्यासाठी घालवणाऱ्या प्रा डॉ एन डी पाटील यांना पुरस्काराने गौरविण्यात आले. अनेक विद्यापीठाने त्यांना मानाची डि. लिट पदवी देऊन गौरवले.

प्रा डॉ एन डी पाटील यांनी अनेक विषयांवर सखोल लेखन केले. शेती जमिनीवरील कमाल मर्यादा आणि महाराष्ट्र सरकारचा प्रतिगामी कायदा, समाज विकास योजनेचे वस्त्रहरण, वाढती महागाई आणि ग्राहकांची ससेहोलपट, काँग्रेस सरकार आणि शेतकऱ्यांची लूट, शेतीमालाला किफायतशीर किंमतीची हमी आणि घाऊक व्यापाराचे राष्ट्रीयकरण, महाराष्ट्र सरकारच्या श्वेतपत्रिकेचे कृष्णस्वरूप, शेवटी हे शिक्षण आहे तरी कोणासाठी?, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे ही त्यांनी लिहिलेले पुस्तके गाजली.

प्रा डॉ एन डी पाटील यांनी अंधश्रद्धा निर्मूलन क्षेत्रातही काम केले. त्यांची मते ठाम होती. महाराष्ट्राच्या गेल्या सत्तर वर्षांच्या सामाजिक आणि राजकीय इतिहासात प्रा. डॉ एन डी पाटील हे एक धडाडिचे आणि लढाऊ नेते म्हणून ओळखले जातात. प्रा डॉ एन डी पाटील म्हणजे महाराष्ट्राचा विवेक आवाज. १७ जानेवारी २०२२ रोजी वृद्धापकाळाने त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राचा पुरोगामी आवाज हरपला असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या पुरोगामी चळवळीची मोठी हानी झाली. आज त्यांच्या जयंतीदिनी त्यांना विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## शिव्या शाप देणारा नव्हे तर आशीर्वाद देणारा व्यवसाय करा !

अवैध दारू साठा जप्त, लाखो रुपयांचा गुटखा जप्त, कोट्यावधी रुपयांचे अमली पदार्थ जप्त, शेतामध्ये गांजा पिकवणारा गजाआड, जुगाराच्या क्लबवर धाड, मटक्याच्या अड्ड्यावर धाड, सावकाराच्या जाचाला कंटाळून आत्महत्या, अधिक पैशाचे आमिष दाखवून लाखो रुपयाला गंडा, फसवून जमीम बळकावली या आणि अशाप्रकारच्या अनेक बातम्या आपण नेहमीच वर्तमानपत्रात वाचत असतो. दररोजच्या वर्तमानपत्रात अशा प्रकारची एक तरी बातमी आपल्याला वाचायला मिळते. विशेष म्हणजे चार वर्षांपूर्वी जेंव्हा देशभर कोरोना होता, कोरोनामुळे संपूर्ण देशात लॉक डाऊन घोषित करण्यात आले होते. संपूर्ण देश कुलूपबंद होता तेंव्हा देखील अशाप्रकारच्या बातम्या वाचायला मिळत होत्या. गुटखा, गांजा यासारख्या अमलीपदार्थांवर राज्यात बंदी आहे. राज्यातील काही जिल्ह्यात दारूवर देखील बंदी आहे मात्र बंदी असतानाही काही महाभाग या बंदीची संधी साधून गुटखा, गांजा बाजारात विकायला आणतात. विशेष म्हणजे हे अमली पदार्थ ब्लॅकने विकली जातात म्हणजे अधिक पैसे देऊन ती विकले जातात. ज्या जिल्ह्यात दारूवर बंदी आहे तिथे देखील ब्लॅकने दारू विकली जाते. काही ठिकाणी पोलीस आणि प्रशासनाचे हात ओले करून बेधडकपणे या पदार्थांची विक्री केली जाते. जुगार मटका यासारखे अवैध धंदे देखील असेच बेधडकपणे सुरू असतात. वरिष्ठांकडून दबाव आल्यास कारवाईचा दिखावा केला जातो, काही दिवसांनी या अवैध व्यवसायांचा पुनश्च हरिओम होतो. कारण संबंधितांनी सोडलेली लाज. केवळ पैसे कमावणे या एकाच उद्देशाने हे महाभाग समाजाचे आरोग्य धोक्यात आणतात. गुटखा खाल्ल्याने दरवर्षी लाखो लोक कर्करोगासारख्या असाध्य रोगाला बळी पडतात. गुटखा खाल्ल्याने कर्करोग होतो हे माहीत असूनही गुटखा बनवणारे गुटखा बनवतात, विकणारे विकतात आणि खाणारे खातात. दारूबंदीचा फक्त फार्स केला जातो. ज्या भागात दारूबंदी आहे त्या भागात तर जास्त दराने दारू विकली जाते. ड्राय डे च्या दिवशीही दारू ब्लॅकने विकली जाते. दारूमुळे लाखो कुटुंबे उध्वस्त झाली आहेत. दारूमुळे संसाराची राखरांगोळी होते. दारू पील्यामुळे यकृताचा आजार होतो. त्या आजारात जर घरातील कर्त्या पुरुषाचा मृत्यू झाला तर त्याची लेकरे बाळे उघड्यावर पडतात हे माहीत असूनही लोक दारू पितात कारण त्यांना ती सहज उपलब्ध होते. जुगार आणि मटका खेळून अनेकजण कर्जबाजारी झाले आहेत. ही कर्जे फेडण्यासाठी सावकाराकडे जाण्याची वेळ अनेकांवर येते. सावकाराकडून काढलेले कर्ज फेडता न आल्याने काहींनी आत्महत्या केल्या आहेत. मटका जुगारामुळे जमीन जुमला विकण्याची वेळ काहींवर आली आहे. हजारो लोकांचे आयुष्य उध्वस्त करणारे, समाजाच्या आरोग्याची नासाडी करणारे कर्करोगासारख्या असाध्य रोगाचा विळखा घालून मृत्यूसमीप नेणारे उद्योग कोणी करू नये अशी सर्वसामान्य नागरिकांची अपेक्षा असली तरी हे सारे सुरूच आहे याचे कारण हे व्यवसाय करणाऱ्या महाभागांना याचे काही देणेघेणे नाही त्यांना हवाय तो फक्त पैसा. पैशासाठी सर्वकाही ! या उक्तीप्रमाणे हे लोक काम करतात. यांना कोणाच्या संसाराचे देणेघेणे नाही की कोणाच्या आरोग्याचे. यांचा उद्देश केवळ आणि केवळ पैसा कमावणे हाच आहे. आपला पैसा कमावण्याचा व्यवसाय हा कोणाचा तरी संसार उध्वस्त करणारा असेल तर त्या पैशातून आपल्याला समाधान मिळेल का ? याचा विचार संबंधितांनी करावा. ज्यांचा संसार उध्वस्त झालाय, व्यसनांमुळे ज्या घरातील कर्ता पुरुष देवाघरी गेलाय त्या घरातील लोक या लोकांना शिव्याशापच देत असतील. तेंव्हा असा शिव्या शाप मिळणारा व्यवसाय करण्याऐवजी लोकांचे आशीर्वाद मिळतील असा व्यवसाय संबंधितांनी करावा.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## स्पेस ऑन व्हील्स - अंतरिक्ष महायात्रेतून परतूर तालुक्यातील विद्यार्थ्यांमध्ये अंतरिक्ष विज्ञानाची ओढ

**परतूर - प्रतिनिधी**

विज्ञान भारती व इस्रो यांच्या संयुक्त विद्यमाने आणि नॅशनल रिमोट सेन्सिंग सेंटर, हैदराबाद यांच्या सहकार्याने आयोजित ''स्पेस ऑन व्हील्स - अंतरिक्ष महायात्रा'' या प्रदर्शनामध्ये परतूर तालुक्यातील २००० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांनी अंतरिक्ष तंत्रज्ञानाची अद्ययावत माहिती जाणून घेतली.



या प्रदर्शनाचे यजमानपद जिल्हा परिषद विद्यालय, परतूर यांनी स्वीकारले होते.
भेट देणाऱ्या शाळा योगानंद विद्यालय परतुर,स्वामी विवेकानंद विद्यालय, परतूर आणि आदर्श माध्यमिक विद्यालय, परतूर आनंद विद्यालय परतुर, लालबहादूर शास्त्री कन्या परतुर, देवगिरी ग्लोबल इंग्लिश स्कूल परतुर, विवेकानंद इंग्लिश स्कूल परतुर, लालबहादूर शास्त्री विद्यालय मोंढा परतुर, ज्ञान लता इंग्लिश स्कूल परतुर, महाराणा इंग्लिश स्कूल परतुर,येथील विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला.

या प्रदर्शनाचे मुख्य आकर्षण म्हणजे नॅशनल रिमोट सेन्सिंग सेंटर, हैदराबाद यांच्या मार्गदर्शनाखाली बसमध्ये ठेवण्यात आलेली भारताचे महत्त्वाकांक्षी गगनयान मिशन, चंद्रयान-४ ची प्रतिकृती तसेच भारतीय अंतरिक्ष केंद्राची प्रतिकृती मराठवाड्यातील विद्यार्थ्यांना हे मॉडेल्स पहिल्यांदाच पाहायला मिळाले. याशिवाय विविध उपग्रहांची माहिती व इस्रोच्या कामाचा आढावा चलन-ध्वनी चित्रफितीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना दाखविण्यात आला.

या कार्यक्रमासाठी परम स्किल्स चे परमेश्वर राजबिंदे विज्ञान भारतीचे सहसचिव श्रीपाद कुलकर्णी व अंतरिक्ष महायात्रा संयोजक अमोल कुंभलकर उपस्थित होते.

पी एम श्री जिल्हा परिषद प्रशाला परतूर शाळेचे मार्गदर्शक शाळा समिती सदस्य भगवानराव मोरे तात्या , शाळा समितीचे अध्यक्ष दया काटे महाराज, उपाध्यक्ष रमाकांत बरीदे सर,मुख्याध्यापक गणेश राठोड आणि सर्व शिक्षकवृंद सर्व विद्यार्थी यांनी आजच्या दिवसाचे आयोजन यशस्वीरीत्या पार पाडले.

तसेच जिल्हा परिषद विद्यालयातील **विद्यार्थी स्वयंसेवकांनी** अतिशय शिस्तबद्ध व सुंदर पद्धतीने इतर विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली.

### पान १ व ४ वरुन...

### इंदेवाडीच्या ५००...

नागरिकांची गैरसोय कमी करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरू असून, पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी महापालिका प्रशासन सातत्याने काम करत असल्याचेही आवाहनात नमूद करण्यात आले आहे.
महत्त्वाचे मुद्दे
इंदेवाडी ते जलशुद्धीकरण केंद्र जाणारी ५०० मिमी मुख्य जलवाहिनी फुटली.
नवीन जालना आणि मंगळबाजार परिसरातील पाणीपुरवठा एक ते दोन दिवस उशिराने होणार.
पाणीपुरवठा विभागाकडून युद्धपातळीवर दुरुस्तीचे काम सुरू.
नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करून महानगरपालिकेला सहकार्य करण्याचे आवाहन.
दुरुस्ती पूर्ण होताच पाणीपुरवठा पूर्ववत केला जाणार.

### घनसावंगी महसूल...

योजनांचा लाभ घेणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांना बसत आहे. शैक्षणिक प्रवेश, शिष्यवृत्ती, नोकरी भरती, बँक कर्ज, पीक कर्ज, शासकीय योजना आणि विविध प्रशासकीय प्रक्रियांसाठी आवश्यक असलेली प्रमाणपत्रे वेळेवर मिळत नसल्याने नागरिकांची गैरसोय वाढत आहे.
महसूल विभागातील तलाठी, मंडळ अधिकारी, लिपिक, महसूल सहाय्यक तसेच इतर आवश्यक पदे तातडीने भरून कार्यालयीन कामकाज सुरळीत करावे, अशी ठाम मागणी नागरिकांनी प्रशासनाकडे केली आहे. रिक्त पदांमुळे केवळ कार्यालयीन कामकाजावरच परिणाम होत नसून शासनाच्या विविध योजनांच्या अंमलबजावणीवरही विपरीत परिणाम होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.
नागरिकांनी प्रशासनाला गुरुवारपर्यंत या प्रश्नावर ठोस निर्णय घेऊन रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही करण्याची मुदत दिली आहे. निर्धारित कालावधीत सकारात्मक निर्णय न झाल्यास शुक्रवार रोजी घनसावंगी तहसील कार्यालयास कुलूप ठोको आंदोलन करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. आंदोलनामुळे कायदा व सुव्यवस्थेची अथवा प्रशासनिक कामकाजाची जी परिस्थिती निर्माण होईल, त्याची संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची राहील, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. नागरिकांच्या हितासाठी तातडीने महसूल विभागातील रिक्त जागा भरून सेवा सुरळीत करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

### शेतकऱ्यांच्या...

या निर्णयातून पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.
''सुमारे ५६ लाख पात्र शेतकऱ्यांना ₹२ लाखांपर्यंत कर्जमाफी देण्याचा निर्णय हा राज्यातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत दिलासादायक असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महायुती सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे,'' असा विश्वास भास्कर आबा दानवे यांनी व्यक्त केला.

### टेंभुर्णीचा बस...

मूलभूत हक्कांकडे दुर्लक्ष करून केवळ राजकीय स्वार्थ साधणाऱ्या पुढाऱ्यांविषयी आता मतदारांमध्ये प्रचंड रोष निर्माण झाला आहे. विकासाच्या नावाखाली सामान्य जनतेला वेठीस धरण्याचे हे राजकारण आता थांबले पाहिजे, अशी मागणी जोर धरत आहे.
मुख्यमंत्र्यांपर्यंत आवाज पोहोचवण्यासाठी मतदानाचा हक्क दाखवण्याचा इशारा!
''का मतदान करता, तुमचा हक्क दाखवा जगास सारी!'' हाच नारा आता टेंभुर्णी गावात घुमू लागला आहे. जर शासन आणि प्रशासनाने आमच्या गावाला हक्काचा, सर्व सोयीसुविधांनी युक्त असा बस स्टँड दिला नाही, तर आगामी काळात मतदार आपली ताकद दाखवून सत्ताधाऱ्यांना घरी बसवल्याशिवाय राहणार नाहीत, असा थेट इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. मुख्य मागण्याः टेंभुर्णी येथे तात्काळ सुसज्ज आणि आधुनिक बस स्थानकाची उभारणी करण्यात यावी. प्रवाशांना बसण्यासाठी शेड, पिण्याचे स्वच्छ पाणी आणि महिलांसाठी स्वच्छतागृहाची सोय करावी. महामार्गावर प्रवाशांना जीव मुठीत धरून उभे राहावे लागू नये, यासाठी सुरक्षित थांबा निर्माण करावा. आता तरी राज्याचे संवेदनशील मुख्यमंत्री या गंभीर आणि ज्वलंत प्रश्नाची दखल घेऊन जाफ्राबाद तालुक्यातील टेंभुर्णीकरांना न्याय देणार का? की नेहमीप्रमाणे ही फाईलही मंत्रालयाच्या कपाटात धूळ खात पडणार? याकडे संपूर्ण जाफराबाद तालुक्याचे लक्ष लागले आहे.

### निवडणुकीवर...

निवडणुकीपूर्वी नगरपंचायतीचा निर्णय व्हावा, अशी मागणी ग्रामस्थांमधून होत आहे

**जूनला निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचा घेतला निर्णय.**

ग्रामस्थांची मागणी वरिष्ठ प्रशासनाकडे पाठविली. त्यानंतर जिल्हा परिषद प्रशासनाने ६ जुलै रोजी प्रस्तावातील त्रुटींची पूर्तता करण्यासाठी तो गटविकास अधिकाऱ्यांकडे परत पाठविला. प्रस्तावात तहसीलदारांचे लोकसंख्या व घनतेचे प्रमाणपत्र, अकृषिक रोजगाराची टक्केवारी, ग्रामपंचायतीच्या कालावधीचे प्रमाणपत्र, भौगोलिक क्षेत्र, चतुःसीमा नकाशा यासह एकूण ९ त्रुटी दाखविण्यात आल्या आहेत. दरम्यान, अनेक वर्षांपासून टेंभुर्णी ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीमध्ये रुपातंर करावे, अशी मागणी केली जात आहे. परंतु, याकडे प्रशासन दुर्लक्ष करत आहे.

### उपवर्गीकरणा विरोधात...

विनोद डिगे, चंद्रकांत चौतमल, प्रकाश राऊत, कौतिकराव राऊत, देविदास पैठणे, राजू साळवे, पिंटू मघाडे, गौतम म्हस्के, मिलिंद पारवे, उमेश सुतार, राजू गवई, राजू भिसे, मच्छिंद्र भिसे, विजय खरात, सर्जेराव
हिवाळे यांच्यासह अनेक कार्यकर्ते सहभागी झाले.
दरम्यान, बौद्ध समाज समन्वयक समितीच्या वतीने पत्रकार परिषद घेऊन आंदोलनाची भूमिका स्पष्ट करण्यात आली. एससी आरक्षणाचे उपवर्गीकरण तातडीने रद्द करून संविधानिक आरक्षण कायम ठेवावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली. सरकारने आंदोलनाकडे दुर्लक्ष केल्यास आगामी काळात आंदोलनाची व्याप्ती आणखी वाढविण्यात येईल, असा इशाराही समितीच्या पदाधिकाऱ्यांनी दिला.

### अपंग जनता...

करण्यासाठी तसेच दिव्यांग, वंचित आणि गरजू नागरिकांच्या प्रश्नांसाठी प्रभावीपणे लढा देण्याचा निर्धार व्यक्त केला. या नियुक्तीबद्दल अपंग जनता दलाच्या महिला जिल्हाध्यक्ष दिपाली पाटील, उपाध्यक्षा सरला लुले, तालुका अध्यक्ष बालाजी पिसाळ, शंकर शिरगुळे, अनिल मगदुले, राजेश कावेटी, सविता बोराडे, जगदीश सातपुते, अनिता लोखंडे, रेयान शेख, नंदू तिडके, शाहरुख शेख, गणराज गवंडे, इमरान शेख, अशोक भोसले, नूर चौधरी, अशोक बरकासे यांच्यासह संघटनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी राहुल मुळे यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

### एलआयसीला...

नंतर सादर केलेल्या दस्तऐवजात ही रक्कम १,७८,०३५ रुपये दाखवण्यात आली होती आणि त्यात काही बदलही करण्यात आले होते. आयोगाने स्पष्ट केले की, सुरुवातीच्या दस्तऐवजाला अधिक पुरावा मूल्य आहे आणि एलआयसीने कमी रक्कम का दिली, याचे कोणतेही ठोस स्पष्टीकरण दिले नाही. या प्रकरणी जालना येथील नोटरी असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. महेश धन्नावत यांनी प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, ''ग्राहक आयोगाचा हा निकाल अत्यंत महत्त्वाचा आणि स्वागतार्ह आहे. विमा कंपन्या अनेकदा पॉलिसी दस्तऐवजातील अटी व शर्तींचा चुकीचा अर्थ लावून किंवा त्यात बदल करून ग्राहकांची फसवणूक करतात. या निकालामुळे अशा प्रकारांना आळा बसेल. ग्राहकांनी कोणतीही पॉलिसी घेताना सर्व कागदपत्रे काळजीपूर्वक वाचावीत आणि त्यांची एक प्रत आपल्याकडे जपून ठेवावी. कोणताही संशय आल्यास किंवा फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यास त्वरित ग्राहक आयोगाकडे दाद मागावी. ग्राहकांनी आपल्या हक्कांसाठी जागरूक राहणे आवश्यक आहे.''

अखेरीस, आयोगाने एलआयसीला सेवेत त्रुटी आणि अयोग्य व्यापार पद्धतीसाठी दोषी ठरवत तक्रार अंशतः मान्य केली. आयोगाने एलआयसीला उर्वरित १,९६,९६५ रुपये लॉयल्टी लाभासह आणि मॅच्युरिटीच्या तारखेपासून ९% व्याजासह देण्याचे निर्देश दिले. याशिवाय, नुकसान भरपाई म्हणून १०,००० रुपये आणि खटल्याचा खर्च म्हणून १०,००० रुपये देण्याचे आदेशही दिले. हा निकाल विमा कंपन्यांच्या मनमानी कारभाराला चाप लावणारा आणि ग्राहकांच्या हक्कांचे संरक्षण करणारा आहे.

# पाऊले चालती पंढरीची वाट – ह. भ. प. विठ्ठल महाराज

**टेंभुर्णी - दत्ता देशमुख**

पाऊले चालली पंढरीची वाट विठ्ठल जळी स्थळी भरला रिता ठाव नाही उरला. आजी दृष्टीने पाहिला विठ्ठलची विठ्ठल आध्यात्मिक परंपरेमध्ये संतांनी आपले जीवन समर्पित केले आहे एवढी मोठी भक्तीची परंपरा लाभलेल्या वैष्णवाच्या वारीच्या शुभेच्छा हे अत्यंत प्रसिद्ध संतश्रेष्ठ जगद्गुरु तुकोबारायाची किंवा संत ज्ञानेश्वर महाराजांच्या परंपरेतील अभंग वचन आहे याचा अर्थ असा की विठ्ठल हा सर्वत्र पाण्यात आणि जमिनीवर भरून राहिला. कोणतीही जागा रिकामी नाही आज मी त्याला माझ्या ज्ञानाच्या दृष्टीने पाहिले तेव्हा मला सर्वत्र केवळ विठ्ठल दिसला अशाच युक्तीप्रमाणे धन्य धन्य आज दिन संत दर्शनाचा अनंत जन्माचा शिन गेला मज वाटे अशी आलिंगन द्यावे कदा न सोडावे चरण.. संत एकनाथ महाराजांच्या या अभंगातून पांडुरंगाच्या भेटीची उत्कट ओढ व्यक्त होते याच भक्तीवादातून लाखो भाविक पंढरपुरला पायी वारीमध्ये जातात विठ्ठल भक्ति मध्ये आषाढी देवशयनी एकादशी चे महत्व अनन्यसाधारण आहे या दिवशी भगवान विष्णू विठ्ठल चार महिन्यासाठी योगनिद्रेत जातात या पवित्र दिवसापासून चातुर्मासाची सुरुवात होते वारकरी सांप्रदायात या दिवसाला वर्षातील सर्वात मोठा उत्सव मानला जातो महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून लाखो वारकरी शेकडो किलोमीटर पायी चालत ज्ञानबा तुकाराम नामाचा गजर करीत आषाढी एकादशीला पंढरपुरात दाखल होतात आणि विठ्ठलाच्या दर्शनाने धन्य होतात या देवशयनी एकादशी पासून देव चार महिन्यासाठी झोपेत जातात या काळात विठ्ठलाची भक्ती नामस्मरण भजन कीर्तन आणि दानधर्माला विशेष महत्त्व असते या दिवशी उपवास केल्याने आणि विठ्ठलाची निसिम भक्तीत लीन झाल्याने मनातील वाईट विचारांचा नाश होतो मोक्षप्राप्तीचा मार्ग सुकर होतो अशी श्रद्धा आहे वर्षातील २४ एकादशी पैकी देवशयनी एकादशीला विशेष स्थान आहे पद्मपुराणामध्ये असे सांगितले आहे की या एकादशीचे व्रत पाळल्याने मागील पापाची शालन होते आणि इच्छा पूर्ण होतात तसेच दैवी शक्तीशी नाते जोडण्यासाठी आध्यात्मिक प्रगती साधण्यासाठी एकच शक्तिशाली दिवस आहे सोलापूर पौराणिक कथेनुसार माधता नावाचा एक प्रजापती राजा होता त्याच्या राज्यात सलग तीन वर्ष पाऊस न पडल्यामुळे दुष्काळ पडला होता प्रजेच्या कल्याणासाठी राजा ऋषीमुनी कडे उपाय विचारू लागला तेव्हा ऋषींनी सांगितले की राजाला



राजाच्या राज्यात एक एक राक्षसी वृत्तीचा मनुष्य नियमाच्या विरुद्ध जाऊन तपस्या करत आहे जोपर्यंत त्याला शिक्षा मिळत नाही तोपर्यंत पाऊस पडणार नाही परंतु राजाने एका निरप्रात व्यक्तीचा वध करण्यास स्पष्ट नाकार दिला या संकटातून सुटका मिळवण्यासाठी ऋषींनी दुसरा मार्ग विचारला तेव्हा ऋषींनी राजाला आषाढ महिन्यातील शुक्लपक्षातील देवशयनी एकादशीचे व्रत पूर्ण विधीपूर्वक करण्यास सांगितले राजाने प्रजे सहयीव्रत पाले त्यांच्या प्रभावामुळे राज्यात मुसळधार पाऊस पडला आणि सर्वत्र सुबत्ता आली या दिवशी विष्णू निद्रेत गेल्यावर सृष्टीच्या पालनाचे कार्य भगवान शिव स्वीकारतात या काळात साधू संत एकाच ठिकाणी राहून जप आणि तब ध्यान करतात चार महिन्यातील कार्तिक महिन्यातील प्रबोधिनी देव उठणी एकादशीला भगवान विष्णु पुन्हा जागे होतात पौराणिक कथेप्रमाणेच संपूर्ण महाराष्ट्रामध्ये चांगला भरभरून पाऊस पडू द्या बळीराजा सुखी राहू द्या अशी समस्त भाविकांच्या वतीने विठुरायाच्या चरणी प्रार्थना सर्वत्र होत आहे पंढरपूरला पुंडलिकाच्या आई-वडिलांच्या सेवेत प्रतिभक्ती प्रति भगवान कृष्णाला वाटले की आपण पुंडलिकाच्या भेटीला पंढरपूरला जावी त्यामुळे आई-वडिलांची सेवा बघून साक्षात भगवान कृष्ण पुंडलिकाच्या भेटीसाठी पंढरपूरला आली साक्षात परब्रम्ह आलेलं हे पंढरपूर महान तीर्थ आहे पुंडलिकाच्या भेटी परब्रम्ह आलेगा चरणी वाहे भीमा उद्धरी जगा या युक्तीप्रमाणे भीमा नदीचा रूपांतर चंद्राच्या कोरीप्रमाणे असल्यामुळे चंद्रभागे चं नाव त्याला मिळालं ज्यावेळेस पांडुरंग पुंडलिकाच्या भेटीला आले त्यावेळेस त्याची आई वडिलांची सेवा चालू होती त्यावेळेस त्याने एक वीट देवासमोर फेकली आणि देवाचे आदरतीत्य केले वर्ण काळामध्ये कौस्तुभ माळा असे तेही मोहक पांडुरंगाचे रूप आजही पंढरपूर येथे विटेवरी उभे आहे भगवान कृष्ण दिसत पंढरपूरला गेले अजून आले नाही म्हणून रुक्मिणी पांडुरंगाला बघण्यासाठी पंढरपूरला नंतर आली म्हणून रुक्मिणी मातेची आणि पांडुरंगाचे मंदिर वेगवेगळ्या स्थानी आहे पांडुरंगाच्या भेटीसाठी सर्वात पहिल्यांदा कैलास पर पर्वताहून नंदीवर बसून शिवपार्वती कार्तिक स्वामी गणपती बाप्पा सह गेले तेव्हापासून पंढरपूरला वारीला जाण्याची प्रथा आहे समस्त वारकरी सांप्रदाय पंढरपूरला जाऊन देवाजवळ जगाच्या कल्याणासाठी प्रार्थना करतात देवशयनी एकादशीच्या दिवशी पिवळे वस्त्र किंवा पांढरे वस्त्र परिधान करावे म्हणजे ते विष्णू प्रिय वस्त्र आहे त्यामुळे वारकरी संप्रदायातील व्यक्ती पांढऱ्या किंवा पिवळ्या वस्त्र परिधान करतात.

**सध्या जाफराबाद तालुक्यातील टेंभुर्णी येथून बरेच भाविक पदयात्रेसाठी कोणी वाहनाने कोणी आळंदीहून गेलेले आहेत हजारोच्या संख्येने गेलेले आहेत. सध्या आधुनिकतेच्या युगात भक्ती मार्गामध्ये बरीच वाढ झालेली आहे लोक भक्ती भावाने आपापल्या सोयीनुसार पांडुरंगाच्या दर्शनासाठी जातात आम्ही सुद्धा गेल्या आठ वर्षापासून टेंभुर्णी येथून पांडुरंगाच्या दर्शनाला एकादशीला जातो त्यामुळे मानसिक समाधान लाभते.**

**पुरोहित विठू महाराज**

# फळ पिक विमा योजना मृगबहार २०२६ बहार मध्ये विक्रमी नोंदणी

**जालना - प्रतिनिधी**

पुनर्रचित हवामान आधारित फळ पिक विमा योजना अंतर्गत मृगबहार २०२६ साठी विमा नोंदणी २७ जून २०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुरू झाली. गतवर्षी मृगबहार २०२५ मध्ये या योजनेमधील एकूण विमा अर्ज संख्या ५२ हजार १२१ होती.

चालू वर्षी मृगबहार मध्ये द्राक्ष, पेरू, लिंबू ,सीताफळ ,मोसंबी ,संत्रा, डाळिंब, चिकू या पारंपारिक पिकांबरोबर अंजीर व हळद या नवीन पिकांचा समावेश पहिल्यांदा करण्यात आला. या पिकांसाठी असलेली प्रती हेक्टर विमा संरक्षित रक्कम पुढीलप्रमाणे आहे.

द्राक्ष विमा संरक्षित रक्कम प्रति हेक्टर ३ लाख ८० हजार रुपये शेतकऱ्याने भरावयाचा साधारण ५ टक्के नुसार विमा हप्ता १९ हजार रुपये प्रति हेक्टर, पेरु विमा संरक्षित रक्कम प्रति हेक्टर ७० हजार रुपये शेतकऱ्याने भरावयाचा साधारण ५ टक्के नुसार विमा हप्ता ३ हजार ५०० रुपये प्रति हेक्टर, लिंबू विमा संरक्षित रक्कम प्रति हेक्टर ८० हजार शेतकऱ्याने भरावयाचा साधारण ५ टक्के नुसार विमा हप्ता ४ हजार रुपये प्रति हेक्टर, सीताफळ विमा संरक्षित रक्कम प्रति हेक्टर ७० हजार शेतकऱ्याने भरावयाचा साधारण ५ टक्के नुसार विमा हप्ता ३ हजार ५००रुपये प्रति हेक्टर,मोसंबी विमा संरक्षित रक्कम प्रति हेक्टर १ लाख रुपये शेतकऱ्याने भरावयाचा साधारण ५ टक्के नुसार विमा हप्ता ५ हजार रुपये प्रति हेक्टर, संत्रा विमा संरक्षित रक्कम प्रति हेक्टर १ लाख रुपये शेतकऱ्याने भरावयाचा साधारण ५ टक्के नुसार विमा हप्ता ५ हजार रुपये प्रति हेक्टर, डाळिंब विमा संरक्षित रक्कम प्रति हेक्टर १ लाख ६० हजार रुपये शेतकऱ्याने भरावयाचा साधारण ५ टक्के नुसार विमा हप्ता ८ हजार रुपये प्रति हेक्टर, चिकू विमा संरक्षित रक्कम प्रति हेक्टर ७० हजार रुपये शेतकऱ्याने भरावयाचा साधारण ५ टक्के नुसार विमा हप्ता ३ हजार ५०० रुपये प्रति हेक्टर,अंजीर विमा संरक्षित रक्कम प्रति हेक्टर १ लाख ६० हजार रुपये शेतकऱ्याने भरावयाचा साधारण ५ टक्के नुसार विमा हप्ता ८ हजार रुपये प्रति हेक्टर, हळद विमा संरक्षित रक्कम प्रति हेक्टर १ लाख ८० हजार रुपये शेतकऱ्याने भरावयाचा साधारण ५ टक्के नुसार विमा हप्ता ९ हजार रुपये प्रति हेक्टर,

या योजनेत अंजीर व सीताफळ या पिकासाठी विमा योजनेत सहभागाचा अंतिम दिनांक ३१ जुलै आहे.

# अंबुजा सिमेंट कडून बर्वे यांना प्रथम बक्षीस

## *ग्रामीण भागातील व्यापारी यांची चांगली कामगिरी*

**दत्ता देशमुख**

ग्रामीण भाग आणि शहरी भाग या मध्ये व्यावसायिक स्पर्धा असून शहरी भागातील व्यापारी आणि ग्रामीण भागातील व्यापारी यांच्या मध्ये नेहमी स्पर्धा असते.या स्पर्धेत आता ग्रामीण भागातील व्यापारी टिकून काम करून बक्षीस पात्र होत आहे.त्याचाच एक भाग म्हणून

टेंभुर्णी येथील अंबुजा कंपनीचे अधिकृत विक्रेते हरिश्चंद्र बर्वे (गोपाल हार्डवेअर) टेंभुर्णी व सब रिटेलर सिद्धी सिमेंट हार्डवेअर चे अभिशेक गोरे टेंभुर्णी यांचा ही जालना जिल्हा प्रथम क्रमांक आल्याबद्दल




अंबुजा कंपनीकडून त्यांचे स्वागत करण्यात आले.या वेळी त्यांना कंपनी कडून रोख रक्कम प्रशस्ती पत्र भेट देऊन सन्मान करण्यात आले.त्याच्या सत्कार वेळी अंबुजा सिमेंट चे सेल्स ऑफिसर शुभम गिरी राहुल पारधी सर टेक्निकल हेड ऑफिसर मराठवाडा सुरेश बाबू मराठवाडा मॅनेजर प्रतीक मालपाणी मराठवाडा टेक्निकल इंजिनिअर पवन कोल्हे जालना जिल्हा टेक्निकल इंजिनिअर यांच्या सह व्यापारी वर्ग आणि अधिकारी उपस्थित होते.हा कार्यक्रम संभाजीनगर येथील हॉटेल एक्सप्रेस इन येथे पार पडला.

# विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी रोटरी रेनबो क्लब आणि भारतीय बालरोग संघटनेचा पुढाकार

## सीटीएमके विद्यालयात ‘संकल्पसंपूर्ण स्वास्थ्य’ आरोग्य जनजागृती कार्यशाळा

**जालना - प्रतिनिधी**

रोटरी क्लब ऑफ जालना रेनबो आणि भारतीय बालरोग संघटना, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने सीटीएमके विद्यालयात एज्यूफेस्ट एक्सेल अंतर्गत संकल्प संपूर्ण स्वास्थ्य या विषयावर बुधवार दि. १५ जुलै रोजी विशेष आरोग्य जनजागृती कार्यशाळा उत्साहात पार पडली. शालेय विद्यार्थ्यांचे आरोग्य सुदृढ व्हावे, या उद्देशाने आयोजित या कार्यशाळेत नववी वी व दहावीच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. प्रमुख पाहुणे म्हणून शाळेचे विश्वस्त प्रवीणभाई भानुशाली आणि अभय मेहता




उपस्थित होते. यावेळी रोटरी क्लब ऑफ जालना रेनबोच्या अध्यक्षा मधुलता भक्कड, सचिव डॉ. अतुल जिंतूरकर, माजी प्रांतपाल डॉ. सुरेश साबू, महेश माळी, शंकर मुंदडा, संजय नागरे, जयेश पहाडे, राजकुमार रुणवाल, नितीन खंडेलवाल, केतन शहा, हेमल भारवाडा, गौरव करवा, कल्पेश भक्कड, पंकज लड्डा आणि डॉ. सीमा माटे, आणि भारतीय बालरोग संघटना यांचे डॉ. श्वेता शिंदे, डॉ. राहुल तोतला, डॉ. कळंबेले, डॉ. सचदेव, डॉ. प्रदीप पंडित, डॉ. सुलोचना वाघ, विद्यालयाचे मुख्याध्यापक देशमुख, उपमुख्याध्यापिका श्रीमती करवंदे यांची उपस्थिती होती. या कार्यशाळेत भारतीय बालरोग संघटनेच्या अध्यक्षा डॉ. तरुणा छाबडा, सचिव डॉ. नामदेव वाघ, डॉ. काथार व डॉ. बेदरकर या तज्ज्ञ डॉक्टरांनी विद्यार्थ्यांना संतुलित आहार, व्यायामाचे महत्त्व, मोबाईल व टीव्हीच्या अतिवापराचे घातक परिणाम, मानसिक आरोग्याची निगा, पुरेशी व नियमित झोप घेण्याची आवश्यकता आणि व्यसनमुक्ती अशा विविध महत्त्वपूर्ण विषयांवर सविस्तर मार्गदर्शन केले. संकल्प संपूर्ण स्वास्थ्य या उपक्रमाचे हे पहिले पाऊल असून, भविष्यात हा स्तुत्य उपक्रम जालना जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये संपूर्ण वर्षभर राबविण्यात येणार असल्याची घोषणा आयोजकांनी केली. कार्यशाळेचे यशस्वीतेसाठी रोटरी क्लब जालना रेनबो आणि सीटीएमके विद्यालयाचे शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# पंढरपूर येथे माजी नगराध्यक्ष भास्करराव अंबेकर यांचे श्रीविठ्ठल-रुक्मिणी दर्शन; राज्यात भरपूर पावसासाठी केली प्रार्थना

**जालना - प्रतिनिधी**

जालना शहराचे माजी नगराध्यक्ष भास्करराव अंबेकर यांनी आषाढीच्या पावन वातावरणात पत्नी सौ.शोभाताई व कन्या नेहा हिच्यासह पंढरपूर येथे

श्रीविठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन घेऊन विधिवत पूजा केली. यावेळी त्यांनी राज्यातील शेतकरी, सर्वसामान्य नागरिक आणि मुक्या

जनावरांच्या कल्याणासाठी श्रीविठ्ठल-रुक्मिणी चरणी प्रार्थना केली. मागील पंधरा दिवसांपासून अनेक भागांत



समाधानकारक पाऊस न झाल्याने बळीराजा

चिंतेत असून शेतकरी आभाळाकडे आशेने डोळे लावून बसला आहे. वेळेत पाऊस न पडल्यास शेतकऱ्यांसह मुक्या जनावरांवरही मोठे संकट ओढवू शकते, करिता ‘‘राज्यात भरपूर व समाधानकारक पाऊस पडू दे, शेतकऱ्यांची पिके बहरून येऊ दे आणि सर्व जनता सुखी, समृद्ध व निरोगी राहू दे,‘‘ अशी श्री विठ्ठल चरणी मनोभावे प्रार्थना केली.

# नेर येथील नागरिकांचे अप्पर तहसीलसाठी आमरण उपोषण

**नेर -प्रतिनिधी**

नेर येथे अप्पर तहसील ची घोषणा झालेली असून त्यात कुठलाही बदल न करता लवकरात लवकर कार्यान्वित करावे यासाठी ग्रामस्थांच्यावतीने आमरण उपोषण सुरू. सविस्तर वृत्त असे की





शासनाने अपर तहसीलची निर्मितीसाठी सर्व नागरिकांना जवळ असे पडणारे गाव जसे की जे मंडळ मध्यभागी येतात व ते गाव सर्व सोयी सुविधा युक्त अशा गावाची नुकतीच नाव जाहीर करण्यात आले होते त्यामध्ये नेरचे पण नाव जाहीर झाले, तेच नाव कायम ठेवून नेर येथेच अंतिम मंजुरी देऊन अप्पर तहसील तातडीने नेरे येथे सुरू करून नागरिकांना दिलासा द्यावा याकरिता नेरे येथील नागरिक यांनी आमरण उपोषणास सुरुवात केली आहे यामध्ये, गजानन उफाड, विक्रम उफाड, अहेमद कुरेशी, शेरफोदिन शेख, विलास सहाने, सय्यद इसाक, अहेमद सय्यद, रुपेश भुतेकर, सोपान कुलवंत, काशीफ चौधरी, तरी प्रशासनाने लवकरात लवकर उपोषणकर्त्यांची दखल घेऊन अप्पर तहसीलची नेर येथेच निर्मिती करून नागरिकांची गैर सोय सोडवावी अशी मागणी नेर व इतर मंडळाचे नागरिकांची होत आहे.

# बेकायदेशीर प्लॉट विक्रीतून कोट्यवधींची फसवणूक

## कारवाई न झाल्यास विभागीय आयुक्त कार्यालयासमोर आमरण उपोषणाचा इशारा

**जालना - प्रतिनिधी**

जालना तालुक्यातील मौजे इंदेवाडी येथील कथित बेकायदेशीर प्लॉट विक्री प्रकरणात तातडीने कारवाई करून संबंधितांवर गुन्हा दाखल करावा, अन्यथा २२ जुलै २०२६ पासून छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय आयुक्त कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा राहुल भास्कर साने यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.



साने यांनी विभागीय आयुक्तांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, गट क्रमांक ८२ मध्ये लक्ष्मीनगर, साईनगर, शिवशंकर नगर, संभाजीराजे नगर, शिवाजीराजे नगर तसेच गट क्रमांक ९६ मध्ये गोकुळ नगर या नावाने प्लॉटिंग योजना राबविण्यात आली. मात्र, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या माहितीनुसार या जमिनींना बिनशेती (एन.ए.) परवानगी नसतानाही प्लॉट विक्री करण्यात आल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला आहे. या बेकायदेशीर व्यवहारामुळे हजारो सर्वसामान्य नागरिकांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक झाल्याचा दावा करत, संबंधित जमीनमालक शेख मुश्ताक शेख आमीर यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करून सर्व बेकायदेशीर प्लॉट विक्री रद्द करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. यासंदर्भात ३ जून व १२ जून २०२६ रोजीही निवेदने देऊनही प्रशासनाने कोणताही निर्णय घेतला नसल्याचा आरोप साने यांनी केला आहे. त्यामुळे न्याय मिळावा आणि दोषींवर कठोर कारवाई व्हावी, या मागणीसाठी विभागीय आयुक्त कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा निर्णय घेतल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

## विशेष सखोल पुनरीक्षण अभियानात जालना जिल्ह्याचा राज्यात ठसा

# मतदार यादीतील मॅपिंगमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या बीएलओंचा जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते गौरव

**जालना - प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राज्यात सुरू असलेल्या विशेष सखोल पुनरीक्षण अभियानांतर्गत सन २००२ पूर्वीच्या मतदार यादीतील मतदारांची नावे सध्याच्या मतदार यादीशी मॅपिंग करण्याचे काम पूर्ण झाले असून, जालना जिल्ह्याने या अभियानात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. या उत्कृष्ट कार्याबद्दल मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) व त्यांच्या पथकांचा जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

भारत निवडणूक आयोगाने १४ मे २०२६ रोजी जाहीर केलेल्या तिसऱ्या टप्प्यातील विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमानुसार महाराष्ट्रासह १६ राज्ये व तीन केंद्रशासित प्रदेशांमध्ये हे अभियान राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमानुसार ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी घरभेटी देऊन मतदारांना गणना प्रपत्र वाटप, अर्ज भरण्यास सहाय्य व डिजिटायझेशनची प्रक्रिया राबवत आहेत. जालना जिल्ह्यात १६ लाख ८२ हजार ७२३ मतदार असून आतापर्यंत १३ लाख ५४ हजार ९२४ मतदारांचे मॅपिंग पूर्ण झाले असून त्याची टक्केवारी ८०.५२ आहे. यामध्ये ९९-परतूर मतदार संघात ३ लाख ३० हजार ३७७ मतदारापैकी २ लाख ८७ हजार ३१० मतदाराची मॅपींग पूर्ण झाली असून त्याची टक्केवारी ८६.९६ आहे. १००-घनसांगवी मतदारसंघात ३ लाख २८ हजार ६०६ मतदारापैकी २ लाख ९९ हजार ५३५ मतदाराची मॅपींग पूर्ण झाली असून त्याची टक्केवारी ९१.१५ आहे. १०१-जालना विधानसभा मतदारसंघात ३ लाख ५८ हजार ६३७ मतदारापैकी २ लाख ३ हजार ३९८ मतदाराची मॅपींग पूर्ण झाली असून त्याची टक्केवारी ५६.७१ आहे. १०२-बदनापूर मतदारसंघात ३ लाख ३८ हजार ९३६ मतदारापैकी २ लाख ८६ हजार ४०९ मतदाराची मॅपींग पूर्ण झाली असून त्याची टक्केवारी ८४.५० आहे. १०३-भोकरदन मतदारसंघात ३ लाख २६ हजार १६७ मतदारापैकी २ लाख ७८ हजार २७२ मतदाराची मॅपींग पूर्ण झाली असून त्याची टक्केवारी ८५.३२ आहे. अभियानाच्या अनुषंगाने १ ऑक्टोबर २०२६ ही पात्रता दिनांक निश्चित करण्यात आला असून, ५ ऑगस्ट रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्यानंतर ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर या कालावधीत दावे व हरकती स्वीकारल्या जातील, तर अंतिम मतदार यादी ७ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे. जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघांमध्ये मतदार मॅपिंगचे काम प्रभावीपणे पूर्ण करणाऱ्या बीएलओंचा आज सत्कार करण्यात आला. या अभियानात परतूर, घनसावंगी, जालना, बदनापूर आणि भोकरदन विधानसभा मतदारसंघातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या बीएलओंना गौरविण्यात आले. या सत्कारमूर्तीमध्ये शरद मुंढे, सुनिल गवई, श्रीमती कालिंदा दवंडे, श्रीराम बहीर, मुकेश गाडेकर, बी. आर. वाघमारे, रमेश मान्टे, श्रीमती शिवगंगा बारगाजे, दिपक मोहिते, शिवाजी ठाकूर, ए. पी. इंगळे या बीएलओंचा समावेश आहे.

मतदार यादी अद्ययावत, अचूक आणि पारदर्शक करण्याच्या दृष्टीने विशेष सखोल पुनरीक्षण अभियान अत्यंत महत्त्वाचे असून, नागरिकांनी मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना आवश्यक माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

